आंदोलन ही चिरंतन प्रक्रिया

चंद्रशेखर पुरंदरे



समाजातील दुर्बल घटकांसाठी जनआंदोलन हेच एक हत्यार आहे. स्थल, काल, आदर्शवाद, उपलब्ध संसाधने यानुसार एखादे आंदोलन वैध मार्ग स्वीकारेल, अहिंसक मार्ग स्वीकारेल, अवैध पण अहिंसक मार्ग स्वीकारेल किंवा अवैध आणि हिंसक मार्ग स्वीकारेल. या मार्गांची परिणामकारकता कमी-जास्त होऊ शकते पण जनआंदोलन या हत्याराची परिणामकारकता बोथट होत आहे असे दिसत नाही.

'जनआंदोलनांची हत्यारे बोथट होत चालली आहेत काय?' हा प्रश्न या दिवाळी अंकाने मांडला आहे. भारतीय संदर्भात हा प्रश्न विचारणे समयोचित आहेच पण जगभराची जनआंदोलने हा प्रश्न स्वत:ला सतत विचारत असतात याचीही नोंद घेणे आवश्यक आहे. जागतिकीकरणाचा विस्तार आणि वेग जसा वाढत आहे तशी या प्रश्नाची निकडही वाढत आहे. प्रथम हे स्पष्ट करायला हवे की समाजातील दुर्बल घटकांसाठी जनआंदोलन हेच एक हत्यार आहे. स्थल, काल, आदर्शवाद, उपलब्ध संसाधने यानुसार एखादे आंदोलन वैध मार्ग स्वीकारेल, अहिंसक मार्ग स्वीकारेल, अवैध पण अहिंसक मार्ग स्वीकारेल किंवा अवैध आणि हिंसक मार्ग स्वीकारेल (या पर्यायांची दखल लेखाच्या शेवटी घेतली आहे.) या मार्गांची परिणामकारकता कमी-जास्त होऊ शकते पण जनआंदोलन या हत्याराची परिणामकारकता बोथट होत आहे असे दिसत नाही.

जनआंदोलनांचे स्वरूप गेल्या पन्नास-साठ वर्षांत बदलत आले आहे. वसाहतवादातून मुक्त होण्यासाठी स्वातंत्र्य चळवळी ही विसाव्या शतकातील मोठी जनआंदोलने जगभर झाली. त्यांचा प्रमुख उद्देश सत्तांतर होता. पण त्या आंदोलनांना सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक असे अनेक पदर होते. देशोदेशीच्या स्वातंत्र्यानंतर जेथे लोकशाही ही व्यवस्था आली तेथे सत्तेत सहभाग हा जनआंदोलनांचा रोख राहिला. म्हणजे, काही आंदोलने राजकीय पक्षात रूपांतरित झाली. सत्ता मिळवली की ज्या समाजघटकांच्या वतीने आपण आवाज उठवत आहोत त्या घटकांचे भले करता येईल हा विचार त्यामागे होता. उदाहरणार्थ भारतात डॉ.आंबेडकरांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली. आता मात्र जगभर जनआंदोलनांची दिशा 'सत्ता' या संकल्पनेलाच आव्हान देताना दिसते. किंबहुना 'सत्ता' नष्ट करणे हेच ध्येय दिसते. या ध्येयाचा आवाका लक्षात घेता हा प्रकल्प अल्पकालीन नाही हे स्पष्ट व्हावे. विकसित देशातील दोन जनआंदोलनांचे उदाहरण पुढे दिले आहे त्यावरून कालावधीचा हा मुद्दा लक्षात यावा.

चंद्रशेखर पुरंदरे
सामाजिक समस्यांवर भाष्य करणारे चित्रकार, राजकीय-सामाजिक विषयांवरील संशोधन व लेखन.

आता 'जनआंदोलन' म्हणजे काय, ते पाहू. हे विवेचन अशासाठी की या आंदोलनांचे वैविध्य, संलग्न अनेक पैलू त्यातून दिसून येतील. प्रत्येक प्रकारचे आंदोलन आणि त्याची हत्यारे याच्या विश्लेषणाची जरूरी नाही पण त्या त्या आंदोलनाच्या प्रकारावरून त्याच्या हत्यारांचा, मर्यादांचा व खोलीचा अंदाज यावा. सामान्यत: एखादी चळवळ आंदोलन आहे का हे ठरवण्याच्या काही कसोट्या असतात. एक म्हणजे जनआंदोलनात अधिकाराची उतरंड नसते. औद्योगिक विश्व, नोकरशाही यांत कनिष्ठ, त्याचा वरिष्ठ, त्याचा वरिष्ठ अशी शिडी असते. आंदोलनात ही शिडी नसते. आंदोलनाची प्रगती समविचारी लोक आणि चळवळी यांच्या सततच्या संपर्कातून होत असते. आंदोलने प्रस्थापित धोरणांना आणि त्यांच्या अंमलबजावणीच्या पद्धतीला आव्हान देतात. आंदोलनामध्ये अंतर्गत मतभेद असू शकतात व या उप-आदर्शवादावर तात्त्विक गटही असू शकतात; म्हणजे आंदोलने बहुजिनसी असतात. आंदोलनात सामील होणाऱ्यांच्या अस्मितेचा आंदोलन हा महत्त्वाचा भाग असतो; वगैरे.

अभ्यासाच्या सोयीसाठी जनआंदोलनांची साधारणपणे तीन प्रकारात वर्गवारी केली जाते. अनेक आंदोलने एकापेक्षा अधिक प्रकारात मोडतात. पहिला प्रकार म्हणजे आर्थिक कारणांवर उभी राहिलेली आंदोलने. ती प्रामुख्याने महागाई, बेरोजगारी यामुळे उभी राहतात. दुसरा प्रकार म्हणजे भूमीसंबंधी आंदोलने. यात औद्योगिकीकरण, धरणे, मोठे रस्ते यामुळे विस्थापित होणारे लोक, शहरातील झोपडपट्टीवासी यांच्या प्रश्नांचा समावेश होतो. तिसरा प्रकार म्हणजे 'न्याय्य हक्क' मिळावा म्हणून होणारी आंदोलने. वंश, वर्ण, जात, स्त्री-पुरुष भेद इत्यादींवर आधारित दुय्यम नागरिकत्वाला ही आंदोलने विरोध करतात. आंदोलनाच्या प्रकारावर आंदोलक ठरतात. म्हणजे, ते समाजाच्या विशिष्ट घटकातून येतात, त्यांची समूहाची म्हणजे 'आपल्या सारख्यांची' व्याख्या ठरते, त्यांचे संबंध समाजाच्या विशिष्ट स्तरांशी येतात, आंदोलनाची व्यूहरचना, मागण्या, त्या मागण्या कशा प्रकारे सार्वजनिक करायच्या याची आखणी (निषेध मोर्चे, अर्ज, उपोषणे, बहिष्कार, वगैरे) अशा अनेक बाबींवर 'हत्यारांची' निवड व परिणामकारकता अवलंबून असते.

आजमितीला तरी जनआंदोलने उभी राहण्यासाठी देशात लोकशाही असणे आवश्यक दिसते. पण जनकल्याणासाठी लोकशाही अपुरी पडते हेही दिसून येते. जनआंदोलने उभी राहतात, याचाच अर्थ लोकशाहीला मर्यादा आहेत. या मर्यादा लक्षात आल्याने जनआंदोलनांची वाटचाल लोककारणाकडे होताना दिसते.

आंदोलनांचा अभ्यास आणखी एका, जरा विस्तृत स्तरावरही केला जातो. जगात सगळीकडेच नागरी व्यवस्था (Civil Society), बाजार आणि राज्यसंस्था (State) यांची परस्पर देवाणघेवाण चालू असते. काही आंदोलने नागरी व्यवस्था आणि बाजार यांच्यातील रूढ (किंवा रूढ होणारे) संबंध बदलू पहातात, तर काही आंदोलने नागरी व्यवस्था आणि राज्यसंस्था यांच्यातील रूढ (किंवा रूढ होणारे) संबंध- यांना लक्ष्य करतात. उदाहरणार्थ लॅटिन अमेरिकेतील एका अभ्यासानुसार १९९० च्या दशकात नागरी व्यवस्था व बाजार यांच्या संबंधांमध्ये परिवर्तन करू पहाणारी जनआंदोलने एकूण आंदोलनांच्या सुमारे एक-चतुर्थांश होती; तर नागरी व्यवस्था आणि राज्यसंस्था यांच्या संबंधांमध्ये परिवर्तनाचा प्रयत्न दहा टक्के जनआंदोलनांनी केला.

जागतिकीकरणाचे प्रमुख परिणाम म्हणजे बाजाराचे प्रभुत्व वाढत आहे, कल्याणकारी योजनांतून राज्यसंस्थेचा सहभाग कमी होत आहे व त्यामुळे सामाजिक विषमता वाढत आहे. या बदलत्या परिस्थितीत लोकशाही देशांमध्ये राजकीय पक्ष निर्णायक भूमिका घेऊ शकेनासे झाले आहेत. सामाजिक संघर्ष तडजोडीने सोडवणे हे आजवर राजकीय पक्षांचे एक काम असे. आता त्यांची प्रस्तुतीच कमी होताना दिसते. विकसित देशात प्रामुख्याने स्वयंसेवी किंवा धर्मादाय (Charity या अर्थी, 'धर्मा'शी त्यांचा संबंध असेलच असे नाही) संस्था ही पोकळी भरून काढतात, तर विकसनशील देशात प्रामुख्याने जनआंदोलने ही भूमिका बजावतात.

जन-आंदोलने - विकसित पश्चिमी राष्ट्रांतील

आता जगभरच्या जनआंदोलनांचा संक्षिप्त आढावा घेऊ. विकसित जगात-म्हणजे भांडवलशाही-लोकशाही असणाऱ्या युरोप-अमेरिकेमध्ये जनआंदोलने मुख्यत: युद्धखोरीविरुद्ध, पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी व मानवी हक्कांच्या संदर्भात आहेत. त्याचबरोबर स्त्रियांचे हक्क, समलिंगी संबंध ठेवणाऱ्यांचे हक्क, गर्भपाताचा हक्क, ग्राहकांचे हक्क, अल्पसंख्यांकाचे हक्क अशा अनेक 'न्याय्य हक्कां'च्या मुद्यांवर १९६० च्या दशकापासून आंदोलनांनी जोर धरला व ही आंदोलने आजही चालू आहेत. त्यांच्या आजवरच्या यशामध्ये- म्हणजे परिणामकारकतेमध्ये- युरोप आणि अमेरिकेत फरक आहे. युरोपच्या तुलनेत अमेरिका पुराणमतवादी, रूढीबद्ध आणि धर्मांध महासत्ता असल्याने तेथील जनमानस युरोपइतके विकसित किंवा 'मुक्त' नाही. युरोपला, निदान पश्चिम युरोपला जशी कल्याणकारी व्यवस्थेची परंपरा आहे, तशी अमेरिकेला नाही. भांडवलशाहीच्या तीव्रतेला आळा घालण्यासाठी कल्याणकारी राज्यव्यवस्था आजवर युरोपमध्ये कार्यरत होती. पण

आता जागतिकीकरणामुळे ही व्यवस्था तकलादू होत आहे. बहुराष्ट्रीय आर्थिक व्यवहार राष्ट्रांच्या सीमा मानत नाहीत. त्यांचा स्थानिक पातळीवरील प्रवेश नफा हे एकमेव सूत्र मानतो. त्यामुळे आरोग्यसेवा, शिक्षण व्यवस्था, बेरोजगारी-अनुदान, बेघरांना निवारा अशा कल्याणकारी योजनांवरचा खर्च सरकारे कमी करत आहेत, किंवा त्यांचे खासगीकरण करत आहेत. अशा धोरणांविरुद्ध असंतोष वाढत आहे पण त्यांचे आंदोलनात रूपांतर होताना दिसत नाही. दरिद्रीकरणाची प्रक्रिया अमेरिकेतही वाढत आहे. पण मुळातच ते राष्ट्र फारसे कल्याणकारी नव्हते, तेथे नागरिकांच्या खाजगी आयुष्यावरील शासकीय नियंत्रणही युरोपपेक्षा जाचक आहे आणि भांडवलशाही बलिष्ठ आहे. त्यामुळे अलिकडच्या काळात नाव घेण्याजोगे मोठे एकच जनआंदोलन सांगता येईल. ते म्हणजे अध्यक्षीय उमेदवार ठरवण्याच्या निवडणुकीत बराक ओबामा यांची डेमोक्रॅटिक पक्षाने केलेली निवड. दुसऱ्या शब्दात, 'मत' हे हत्यार आणि राजकीय मुख्य प्रवाहांतर्गत (पक्षीय राजकारणात) असे या आंदोलनाचे स्वरूप राहिले.

त्यात, पश्चिमेत, वर म्हटल्याप्रमाणे स्वयंसेवी संघटनांचे जाळेही विकसनशील देशांपेक्षा खूपच विस्तृत असते. अंधांसाठी संस्था, वृद्धांसाठी संस्था, पोरक्या कुत्र्यांसाठी संस्था, वगैरे. त्यामुळे समाजाच्या या घटकांचा असंतोष आंदोलनापर्यंत पोचण्याची वेळ बहुधा येत नाही.

तरीही राजकीय प्रवाहांची दिशा ठरवण्याची पश्चिमेतील सामान्य माणसाची क्षमता कमी होत आहे. राज्यशकट राजकारण्यांपेक्षा तज्ञांच्या हाती एकतर गेलेले आहे किंवा राजकारणातला उदात्तपणा जाऊन त्याला व्यवसायाचे रूप आले आहे. त्यामुळे राजकीय प्रक्रियांबाबत मोठा भ्रमनिरास व उदासीनता आढळते. माझ्या आयुष्यावर माझे नियंत्रण फार कमी आहे- राज्यसंस्था, बाजार आणि प्रसारमाध्यमे (मूल्ये निर्माण करण्याच्या दृष्टीने) माझे आयुष्य ठरवतात ही भावना तीव्र होत आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचा हा संकोच मोठा असंतोष निर्माण करतो. नागरिक हा प्रामुख्याने ग्राहक झाल्याने येणाऱ्या अगतिकतेचा फायदा उजव्या शक्ती घेतात. मग वर्णद्वेष, वंशद्वेष, परकीयांचा द्वेष, मुसलमानांचा द्वेष यावर आधारित फुटकळ आंदोलने अधूनमधून जोर धरतात. तरीही ही आंदोलने बहुश: राजकीय मुख्य प्रवाहात सामील होण्याचा, आपल्या भूमिकेवर वैधानिकतेचे शिक्कामोर्तब करून घेण्याचा प्रयत्न करतात. म्हणजे सनदशीर मार्गाने जातात.

वैयक्तिक अगतिकतेच्या परिस्थितीतही, युरोपमध्ये तरी, आहे ही व्यवस्था उर्वरित जगाच्या मानाने सुरक्षित आहे याची जाणीव असल्याने त्या व्यवस्थेत अंतर्गत बदल करण्याकडे कल रहातो; म्हणजे, स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत असंतोषाच्या अभिव्यक्तीचे दबाव गट किंवा पर्यायाने राजकीय पक्ष हेच प्रमुख माध्यम रहाते.

पश्चिमेतील निवडणुकीच्या राजकारणाखेरीजच्या जनआंदोलनांची परिणामकारकता पहाण्यासाठी स्त्रीवादी चळवळीचे उदाहरण घेऊ. या चळवळीने जोर धरल्यानंतर दोन-तीन दशकांत धोरणे ठरवणाऱ्या मुख्य प्रवाहात - म्हणजे राज्यसंस्था, उद्योगधंदे, प्रसारमाध्यमे यांमध्ये दृश्य फरक आढळून येत आहेत. विशेषत: युरोपमध्ये 'समान कामाला समान वेतन' (स्त्री व पुरूषांच्याबाबत) हे धोरण कायदा म्हणून अस्तित्त्वात आले. 'स्त्री' म्हणून नोकरीवर कमी दर्जाची वागणूक देणे हा दखलपात्र गुन्हा झाला. १९७५ चे दशक संयुक्त राष्ट्र संघटनेने स्त्री-दशक म्हणून जाहीर केले. आता तर जर्मनीसारख्या देशात नोकरी देताना स्त्रियांना प्राधान्य दिले जाते, स्पेनमध्ये केंद्रीय मंत्रिमंडळात स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षा जास्त आहे.

दुसरे उदाहरण समलिंगी संबंध ठेवणाऱ्या व्यक्तींना भिन्नलिंगी संबंध ठेवणाऱ्या व्यक्तींइतकेच समान हक्क मिळावेत - या आंदोलनाचे. या आंदोलनाच्या मागण्या मुख्य प्रवाहातर्फे मान्य व्हायला ३०-४० वर्षे गेली. आता युरोपमध्ये व अमेरिकेच्या काही राज्यांत हे संबंध कायदेशीर ठरतात. या व्यक्तींचे विवाह, दत्तक-संतती, घटस्फोट, वारसाहक्क वगैरे कौटुंबिक बाबी भिन्नलिंगी कुटुंबाप्रमाणेच वैध आहेत.

म्हणजे नदीच्या मुळासारखेच आंदोलनाचे मूळ जरी नक्की सांगता येत नसले तरी या उदाहरणांवरून आंदोलन सफळ व्हायला (संपूर्ण नव्हे) किती वेळ जातो याचा अंदाज यावा.

जनआंदोलने - स्वयंसेवी संस्था - (पर्यायी) राजकारण (पर्यायी) अर्थकारण

आता विकसनशील जगातील आंदोलनांचा आढावा घेण्याआधी या दोन्ही जगात कार्यरत असणाऱ्या स्वयंसेवी संघटना व त्यांचे जनआंदोलनांशी असणारे संबंध यांचा परामर्श घेऊ. तसेच आंदोलने ते पक्षीय राजकारण या पश्चिमेतील प्रवासाचा पर्यावरणाच्या संदर्भात आढावा घेऊ. १९८१ ते २००१ या वीस वर्षात फक्त आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या स्वयंसेवी संघटनांची संख्याच पाच हजार वरून दहा हजारावर गेली. 'पर्यायी विकासाच्या' शिखरपरिषदांमध्ये भाग घेणाऱ्या जनआंदोलनांच्या प्रतिनिधींची संख्या सतत वाढतेच आहे. जानेवारी २००१ पासून झालेल्या अशा शिखर परिषदांच्या एक तृतीयांश परिषदांमध्ये (प्रत्येकी) जगभराच्या जनआंदोलनांच्या दहा हजाराहून अधिक प्रतिनिधींनी भाग घेतला. स्वयंसेवी संघटना आणि जनआंदोलने - दोन्ही - समाजाच्या दुर्बल घटकांच्या प्रगतीसाठी प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांच्यात तणाव निर्माण होणे अपरिहार्य असते.

गेली काही वर्षे हा तणाव-प्रसंगी संघर्ष-हा पश्चिमेत मोठ्याच वादाचा मुद्दा झाला आहे. स्वयंसेवी संघटना जनआंदोलनांना पूरक,

स्पर्धक का मारक याभोवती हा वाद आहे. त्याच्या फार खोलात जाण्याची जरूरी नाही पण आपल्या लेखाच्या संदर्भात एक मुद्दा नमूद करायला हवा. बऱ्याच वेळा जनआंदोलने काही मागण्यांसाठी जनजागृती करतात, ही जागृती झाली की स्वयंसेवी संघटना तो कार्यक्रम 'आपला' म्हणून स्वीकारतात. या संघटनांची आर्थिक ताकद प्रचंड असते, त्यांची नोकरशाही लवचिक नसते, राज्यसंस्थेच्या विरोधापेक्षा राज्यसंस्थेबरोबर काम करण्याची त्यांची वृत्ती असते. त्यांना पैसा मिळतो तो पश्चिमेतल्या सामान्य नागरिकांच्या देणगीतून. या नागरिकांचे तिसऱ्या जगात राबवल्या जाणाऱ्या कार्यक्रमांचे प्राधान्यक्रम चमत्कारिक असतात. कारण त्यांना तिसऱ्या जगातील वस्तुस्थितीची माहितीच अतिशय त्रोटक असते. *(माझ्या ब्रिटनमधल्या बारा वर्षांच्या वास्तव्यातून आणि युरोप-अमेरिकेच्या प्रवासातून हे मत बनलेले आहे.)* त्यामुळे जनआंदोलनांनी जो प्रश्न पुढे आणला, त्याच्या सोडवणुकीचे स्वरूपच स्वयंसेवी संघटना बदलून टाकते.

सामान्य माणसाच्या वर्तणुकीतील बदल पर्यावरणवादी चळवळीने किती होतो आणि प्रसारमाध्यमांनी सुरू केलेल्या जोरदार कार्यक्रमांनी किती होतो हे सांगणे अवघड आहे. गेली २५ वर्षे पर्यावरणवादी सक्रिय आहेत तर प्रसारमाध्यमांनी पर्यावरणाचा प्रश्न गेल्या दोन-तीन वर्षांतच लावून धरला आहे आणि लोकांच्या सवयीतील बदलही अलिकडेच होताना दिसतो.

आंदोलनांचे पक्षीय राजकारणात रूपांतर आता विचारात घेऊ. त्यासाठी प्रामुख्याने युरोपातील पर्यावरणवादी (Green) पक्षांचे उदाहरण घेतले आहे.

१९६० च्या दशकापासून विकसित जगात पर्यावरणवादी विचाराने जोर धरला. जनजागृती, मग दबावगट असे चळवळीचे सुरूवातीचे स्वरूप होते. पर्यावरणाचे रक्षण, समाजाच्या तळातल्या वर्गाचा सहभाग असणारी लोकशाही उभी करणे, सामाजिक न्याय आणि अहिंसा या चार आधारस्तंभांवर ही आंदोलने सुरू झाली आणि आजही या पक्षांचे तेच आधारस्तंभ आहेत. राज्यसंस्था आणि बहुराष्ट्रीय कंपन्या या धोरण ठरवणाऱ्या शक्तींवर परिणाम करायचा असेल तर पक्षीय राजकारणात शिरायला पर्याय नाही याची जाणीव होऊन हळुहळू जगभरच अशा पक्षांची स्थापना झाली. १९७२ ला ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, मग १९८० च्या दशकात युरोप व इतर जगात निवडणुकांत असे पक्ष उतरले. आज जगात जवळजवळ ७०-७५ देशात पर्यावरणवादी पक्ष आहेत. युरोपमध्ये सुमारे २५ वर्षे या पक्षांचे खासदार निवडून येत आहेत.

तीन-चार गोष्टी या संदर्भात जाणवतात. एक तर फक्त स्वत:च्या बळावर पर्यावरणवादी पक्ष कोठेच सत्तेवर नाही. सत्ताधारी युतीचा भाग म्हणून युरोपातील अनेक देशांत त्यांचा सत्तेत सहभाग झालेला आहे आणि आहे. अनेक देशांत त्यांचे लोकसभेतील बळ दुर्लक्षिण्यासारखे नाही. त्यांचे १०% हून अधिक खासदार लोकसभांत आहेत. याचा एक अर्थ म्हणजे मुख्य प्रवाहात थोडाफार बदल करणारे कार्यक्रम या दृष्टीने या पक्षांच्या धोरणांकडे पाहिले जाते. मुख्य प्रवाहाला पर्याय म्हणून त्यांना मान्यता मिळत नाही. मुख्य प्रवाहाने यांच्या कार्यक्रमाचा काही भाग 'आपला' म्हणून स्वीकारला तर 'पर्याया'ची शक्यता आणखी दुरावते. उदाहरणार्थ, या वर्षीच्या सप्टेंबरमध्ये ब्रिटनच्या उद्योगमंत्र्याने पुढच्या काही वर्षांसाठी औद्योगिक धोरण जाहीर केले. ज्या उद्योगांच्या उत्पादनाहून कमी कार्बन पर्यावरणात येतो, त्यांना प्रोत्साहन मिळेल; पुनर्वापर होणाऱ्या ऊर्जेवर आधारित उद्योगांना प्राधान्य मिळेल- इथपर्यंत पर्यावरणवाद्यांच्या कार्यक्रमाचा परिणाम दिसतो. पण त्याचबरोबर मुख्य प्रवाहाचीही धोरणे आहेत. चीन व भारतात उत्पादन करण्यासाठी सुमारे ६०० ब्रिटीश कंपन्या उत्सुक आहेत. सरकार त्यांनाही मदत करणार आहे. या बहुराष्ट्रीयीकरणाला भारतातील पर्यावरणवादी विरोध करू शकतात. म्हणजे, एकतर पर्यावरणवादी विकास पहिल्या आणि तिसऱ्या जगात निराळ्या अंगाने जाऊ शकतो; दुसरे म्हणजे मुख्य प्रवाह पर्यावरणवादी विकास विरुद्ध प्रस्थापित विकास असे द्वंद्व मान्य करत नाही. त्याचवेळी, भांडवलशाही विकासाला पर्यायही पर्यावरणवादी मांडू शकत नाहीत. आणखी एका गोष्टीचा लेखात वेळोवेळी उल्लेख केलेला आहे. जागतिकीकरणामुळे राज्यसंस्थेचा संकोच होत आहे. मुळात बहुराष्ट्रीय अर्थव्यवहारांच्या दिशेवर परिणाम करण्याची राज्यसंस्थेचीच ताकद जर कमी होत असेल, तर त्या राज्यसंस्थेचे 'अल्पभागधारक' असणारे पर्यावरणवादी पक्ष किती दूरगामी, मूलभूत निर्णय घेऊ शकणार?

पुढचा मुद्दा आर्थिक आहे. पर्यावरणवादी पक्ष ज्याप्रकारचे निर्णय लोकांनी घ्यावेत असा आग्रह धरतात, ते निर्णय पर्यावरणाला पोषक असले तरी परवडणारे नसतील, तर बहुसंख्यांकांचा अशा कार्यक्रमांना पाठिंबा मिळत नाही. दोन उदाहरणांनी हा मुद्दा स्पष्ट होईल. आंतरराष्ट्रीय मुक्त बाजाराला (फ्री ट्रेड) पर्यावरणवाद्यांनी न्याय्य बाजार (फेअर ट्रेड) हा पर्याय मांडला. तिसऱ्या जगातून तयार कपड्यांची युरोपमध्ये मोठ्या प्रमाणावर आयात होते. अशा कपड्यांच्या उत्पादनात जर तिसऱ्या जगातील बालमजूर भाग घेत असतील, तर युरोपियन ग्राहकांनी असे कपडे-बूट विकत घेऊ नयेत हा फेअर ट्रेडचा एक मुद्दा. असा माल बाजारात आणणाऱ्या

कंपन्यांची नावेही जाहीर होतात. पण त्यामुळे त्या कंपन्यांच्या ग्राहकांनी त्यांच्यावर सरसकट बहिष्कार घातला, त्यांची उलाढाल लक्षणीय प्रमाणात कमी झाली असे चित्र दिसत नाही.

दुसरे उदाहरण म्हणजे बहुतेक सगळ्याच भाज्या, अन्नपदार्थ युरोपमध्ये आफ्रिका, दक्षिण अमेरिकेतून आयात होतात. त्यात दोन प्रकार असतात. एक रासायनिक खतांचा वापर झालेली उत्पादने, दुसरा नैसर्गिक खतांचा वापर झालेली उत्पादने. या दोन्ही प्रकारच्या भाज्या दुकानात शेजारीच विकायला ठेवलेल्या असतात. आणि 'नैसर्गिक' उत्पादने नेहमीच जास्त महाग असतात. वाढलेल्या महागाईत (गेल्या काही महिन्यांतच अन्नपदार्थांचे भाव युरोपमध्ये ३० ते ४० टक्क्यांनी वाढले आहेत.) सामान्य ग्राहक हा नैतिक त्याग करू शकत नाही.

ही झाली युरोपियनाची ग्राहक म्हणून भूमिका. उत्पादनप्रक्रियेतील नोकरदार म्हणून भूमिका जास्त गुंतागुंतीची असते. माणूस ज्या कंपनीत नोकरीला आहे, त्या कंपनीची पर्यावरणसंबंधी धोरणे पटत नसली तरी दुसरी नोकरीच उपलब्ध नसेल, तर अगतिकतेने त्याला तेथेच काम करणे भाग असते. पेट्रोलच्या अलिकडे वाढलेल्या प्रचंड किंमतीमुळे ब्रिटिश पेट्रोलियमसारख्या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी जास्तीच नफा केला. हे नफे तिसऱ्या जगाच्या अर्थकारणात मारक आहेतच पण तो व्यवसायच पर्यावरणाच्या हानीला मदत करतो. ब्रिटनच्या ग्रीन पार्टीच्या नवनिर्वाचित अध्यक्षांनी या नफ्यांवर प्रचंड कर लादावा अशी मागणी केली आहे. अगदी कर लादला, वसूल केला, तरी त्याचा विनियोग पर्यावरण रक्षणासाठी होईल, याची काय हमी? एकूण युरोपमध्ये पर्यावरणासंबंधी चित्र असे आहे. प्लॅस्टिक बॅगा वापरू नयेत ही सामान्य माणसाला शक्य असणारी गोष्ट. त्यांचा वापर आता कमी होत चालला आहे. पण सामान्य माणसाच्या वर्तणुकीतील असा बदल पर्यावरणवादी चळवळीने किती होतो आणि प्रसारमाध्यमांनी सुरू केलेल्या जोरदार कार्यक्रमांनी किती होतो हे सांगणे अवघड आहे. गेली २५ वर्षे पर्यावरणवादी सक्रिय आहेत तर प्रसारमाध्यमांनी पर्यावरणाचा प्रश्न गेल्या दोन-तीन वर्षांतच लावून धरला आहे आणि लोकांच्या सवयीतील बदलही अलिकडेच होताना दिसतो.

एकूण युरोपमध्ये पर्यावरणासंबंधी चित्र संमिश्र आहे. ना व्यावहारिक पर्याय, ना पक्षीय राजकारणाबाहेर राहून मोठी जनजागृती या संदिग्धतेत तेथील पक्ष अडकलेले आहेत.

जनआंदोलने - तिसऱ्या जगातील

आता उर्वरित जगातील जनआंदोलनांकडे वळू. विकसनशील देशात जनआंदोलनांचे स्वरूप विकसित देशातील आंदोलनांपेक्षा गुणात्मकदृष्ट्या निराळे आहे. गेल्या पन्नास वर्षांत लोकशाही व्यवस्था स्वीकारलेल्या देशांमध्ये मागच्या वीस वर्षात जनआंदोलनांची प्रचंड वाढ झाली आहे. ही दोन दशके जागतिकीकरणाची दशके आहेत. तदनुषंगिक वाढते औद्योगिकीकरण, पर्यावरणाची हानी, शहरीकरण, शेतजमिनींवरचे उद्योगधंद्यांचे आक्रमण, स्त्रियांच्या पारंपारिक भूमिकेतील बदल आणि राज्यकर्त्यांचे जनतेपासूनचे वाढते अंतर अशी अनेक कारणे या वाढीमागे आहेत.

प्रथम दक्षिण अमेरिकेतील परिस्थिती पाहू. मागच्या शतकाच्या उत्तरार्धापासून दक्षिण अमेरिकेत औद्योगिकीकरणाबरोबर शहरीकरण वाढले. शेतीवर गुजराण होणे शक्य नसल्याने व उद्योगात रोख पैसा मिळत असल्याने शहरांकडे ओघ वाढला. मग नव्या शहरवासियांच्या नागरी सुविधांच्या मागण्या वाढल्या. वीज, पाणी, घरे, रस्ते अशा मागण्यांशी संबंधित आंदोलने तेथे प्रथम उभी राहिली. त्यावेळी दक्षिण अमेरिकेत बहुतेक देशात हुकूमशाही किंवा नावाची लोकशाही असल्याने सरकारी दडपशाही वाढली. त्यामुळे विरोध अधिक तीव्र झाला. तोपर्यंत संघटित कामगार किंवा शेतमजूर निषेधासाठी रस्त्यावर येत. आता स्त्रिया, विद्यार्थी, शिक्षक, पर्यावरणवादी हे रस्त्यावर येऊ लागले. म्हणजे युरोपमध्ये जसा वर्ग-अधिष्ठित ट्रेड युनियन्सचा ऱ्हास झाला, तसेच वर्ग-अधिष्ठित आंदोलनांचे प्रमाण दक्षिण अमेरिकेत कमी झाले. आंदोलने आता आर्थिक मागण्यांबरोबरच हक्कांसाठीही होऊ लागली. उपजीविकेचा हक्क, (स्त्रियांचा) स्वतःच्या शरीरावरील हक्क, जमिनीवरील हक्क, वगैरे. नागरी व्यवस्थेतील आपले स्थान 'परत' मिळवण्यासाठी ही आंदोलने उभी राहिली. आणि चालू आहेत. अपरिहार्यतेने या आंदोलनांना राजकीय भूमिका घ्यावी लागते. शासन जर दमन करत असेल तर त्याविरुद्ध उभे राहावेच लागते. युरोप-अमेरिकेपेक्षा ही आंदोलने भिन्न आहेत. ती अन्न, पाणी, जमीन यांच्याशी संबंधित राहिली. दुसरा फरक म्हणजे, शासन व बाजार यांच्या तावडीतून व्यक्तीची सुटका करण्यासाठी युरोपातील आंदोलने प्रामुख्याने जन्माला आली तर दक्षिण अमेरिकेतील आंदोलने प्रामुख्याने बिरादरी (Community) च्या पुनः स्थापनेसाठी सुरू झाली.

वरवर पाहता ही आंदोलने दडपण्यामागे त्या त्या देशाची हुकूमशाही जबाबदार असली तरी त्यामागे आंतरराष्ट्रीय भांडवल व अमेरिकन लष्करी सामर्थ्य होते. या हुकूमशाह्या एकामागून एक अस्त पावल्या. मग भारतासारखेच विरोधी चित्र उभे राहिले. लोकशाही आली पण सामाजिक विषमता वाढतच चालली. या दरम्यान ग्रामीण भागात फार मोठ्या प्रमाणावर आंदोलने उभी राहिली. या आंदोलनांचे स्वरूप फक्त आर्थिक न राहता अस्मिता, संस्कृती, जीवनपद्धती यांनाही महत्त्व प्राप्त झाले. मग शहरी संस्कृती, बाजार व राज्यसंस्था यावर आधारित आहे, म्हणजे, पर्यायाने दक्षिण अमेरिकेपेक्षा अमेरिकेला जवळची आहे तर ग्रामीण संस्कृती

पारंपारिक-सामुदायिक मूल्यांवर आधारित आहे असे द्वंद्व उभे राहिले. भारतातील जनआंदोलने याच धर्तीवर पहाता येतील. त्यांच्या विस्तृत वर्णनाची येथे आवश्यकता नाही पण आपल्याकडे अशा आंदोलनांबरोबर जातीयवादी आंदोलनेही सुरू झाली हे लक्षात ठेवले पाहिजे.

आशियातील एक प्रगत आर्थिक देश म्हणून थायलंडचे उदाहरण आता पाहू. थायलंड ही कधीही वसाहत नव्हती. तेथे ब्रिटिश थाटाची लोकशाही आहे. म्हणजे राजाही आहे पण निर्वाचित लोकसभा-राज्यसभाही आहेत. तिथे राजकीय भ्रष्टाचार प्रचंड आहे आणि १९३२ सालापासून निर्वाचित सरकार व लष्कर यांच्याकडे आलटून पालटून सत्ता राहिलेली आहे. तरीही पाकिस्तानसारखी परिस्थिती नाही. देशाची आर्थिक प्रगती गेल्या दशकापर्यंत जोमाने झाली. तेथे शेतकऱ्यांची आंदोलने १९७० च्या दशकापासून सुरू झाली. पर्यायी विकासाचा आग्रह या आंदोलनांनी धरला. भविष्यात एक आदर्श समाज निर्माण होईल या आशावादावर ही आंदोलने उभी राहिली. या आंदोलनांमध्ये बिरादरी; ग्रामीण जीवनपद्धतीचे पुनर्निर्माण यावर भर होता. जागतिकीकरणामुळे स्थानिक रहिवाशांवर लादलेले स्थलांतरण, नैसर्गिक संसाधनांवरील अतिक्रमण यामुळे असंतोष वाढत होता. लोकशाहीच्या दरम्यान या असंतोषास आंदोलनाचे रूप लाभले. गेल्या दशकातील या आंदोलनांमध्ये आजवरच्या उपेक्षित समाजघटकांचा समावेश झाला आहे. ईशान्य भारतातल्या सारख्या डोंगराळ प्रदेशात रहाणाऱ्या आदिम जमाती, छोटे मासेमार, अल्पभूधारक शेतकरी, झोपडपट्टीवासी, नोकऱ्या करणाऱ्या स्त्रिया यांना अलिकडच्या काळापर्यंत राजकीय पटलावर स्थान नव्हते. या घटकांनी आंदोलने उभारली. आता समाजातील त्यांचे स्थान व हक्क याबाबत ते जागृतपणे मागण्या करत आहेत. वसाहतवादाचा इतिहास नसल्याने थायलंडमध्ये स्वातंत्र्याची चळवळही झाली नाही. त्यामुळे अभिजनांनी ठरवली ती राष्ट्रीय अस्मितेची व्याख्याच मान्य झाली. मग १९९० च्या दशकातील जनआंदोलने हाच तेथील लोकशक्तीचा पहिला आविष्कार ठरला. विशेषत: राजकारण्यांच्या भ्रष्टाचाराविरुद्धच्या आंदोलनांना, त्या दृष्टीने घटनादुरुस्ती करण्याच्या प्रयत्नांना मध्यमवर्गाचाही पाठिंबा मिळाला. राजकारणी व नोकरशाही हे जनतेचे सेवक असण्याऐवजी मालक असल्यासारखेच वागतात ही आपल्याकडची भावना तेथेही आहे. या सरंजामशाहीविरुद्धच्या असंतोषाला आंदोलनांद्वारे वाचा फुटली.

उर्वरित जगाचा विचार करता, आजमितीला जेथे एकाधिकारशाही आहे - मग ती घराणेशाही (- सौदी अरेबिया व इतर काही मुस्लिम राष्ट्रे-) असेल, लष्करांकडे सत्ता असेल, एकपक्षीय राजवट असेल - तेथे जनआंदोलने उभी रहाणे अशक्यप्राय दिसते. आफ्रिकेतील अनेक राष्ट्रे, चीन, रशिया येथे आज ही परिस्थिती आहे. इराणमधील क्रांती, रशियातील साम्यवादाचा पाडाव या प्रचंड जनआंदोलनांनंतर आलेल्या राजवटींनी लोकशाहीचा बुरखा घेतला आहे. इजिप्तमध्येही अनेक वर्षे एकपक्षीय (खरे तर एकाच माणसाची) राजवट आहे. या देशांमध्ये असंतोषाचे उद्रेक अधून मधून होतात पण आंदोलन होत नाही. कारण राज्यसंस्था दमन करते. उदाहरणार्थ इजिप्तमध्ये ब्रेडचे भाव वाढल्यामुळे; इराणमध्ये खाणीतील कारखान्यांतील अपुऱ्या सुरक्षांविषयी; चीनमध्ये पोलीस, नोकरशहा, पर्यावरणाची हानी याविरुद्ध निषेधांच्या बातम्या येतात.

दक्षिण अमेरिकेचा जरासा निराळा इतिहास सोडता, आजमितीला तरी जनआंदोलने उभी राहण्यासाठी त्या देशात लोकशाही असणे आवश्यक दिसते. पण जनकल्याणासाठी लोकशाही अपुरी पडते हेही दिसून येते. जनआंदोलने उभी राहतात, याचाच अर्थ लोकशाहीला मर्यादा आहेत. या मर्यादा लक्षात आल्याने जनआंदोलनांची वाटचाल लोककारणाकडे होताना दिसते.

वर चर्चा केलेल्या अनेक प्रकारच्या 'उघड' आंदोलनांपेक्षा निराळ्या प्रकारचे आंदोलनही असू शकते. मलेशियातील शेतमजुरांचा वीस वर्षांपूर्वी एक अभ्यास झाला होता. शेतीच्या यांत्रिकीकरणाविरुद्ध, वेगळी पिके काढण्याच्या जमीनदारांच्या निर्णयाविरुद्ध या शेतमजुरांनी 'छुपे' आंदोलन चालू ठेवल्याचे या अभ्यासात लक्षात आले. शेतसारा, पाणीपट्टी, कर भरायला दिरंगाई करणे, खळखळ करणे, जमीनदारांविरुद्ध अफवा पसरवणे, भुरट्या चोऱ्या करणे, नुकसानभरपाईच्या अवास्तव मागण्या करणे अशा प्रकारे निषेध व्यक्त होत होता. आंदोलन या दृष्टीने ते संघटित नव्हते, त्याच्या कागदोपत्री अधिकृत मागण्या नव्हत्या किंवा हजारोंच्या संख्येने हे लोक रस्त्यावरही आले नाहीत. कोणाशीच आमने सामने व दृश्य संघर्ष न होताही त्यांना हव्या असलेल्या गोष्टी त्यांनी काही प्रमाणात मिळवल्या. अशा आंदोलनांच्या हत्यारांचीही दखल घेतली पाहिजे.

भविष्याच्या दृष्टीने जनआंदोलनांची वाढ राष्ट्राच्या सीमा ओलांडेल असे वाटते. या प्रक्रियेला सुरूवात झाली आहेच. भांडवलशाहीच्या मालकीच्या एकछाप प्रसारमाध्यमांना शह म्हणून वैयक्तिक 'मालकी'चे इंटरनेट हे संपर्काचे महत्त्वाचे माध्यम आहे. त्याने आंतरराष्ट्रीय संपर्कजाळे विणले जात आहे. मोबाईल फोनने सुरू केलेली क्रांती इंटरनेट पुढे नेईल असे मानता यावे.

आंदोलनांचे मार्ग

शेवटी आंदोलनांच्या अवैध आणि हिंसक मार्गांचा मुद्दा पाहू. या अंकाच्या मूळ प्रश्नातील 'हत्यारे' हा शब्द 'साधन' या अर्थाने घेतला तर प्रश्न साधन शुचितेच्या कसोटीवर पारखायला हवा. मग आंदोलनांचे हिंसक मार्ग वर्ज्य ठरतात. अवैध मार्ग कदाचित मान्य ठरतील. कारण वैध-अवैध ठरवणाऱ्या शासनसंस्थेलाच जर नैतिक

अधिकार राहिलेला नसेल, तर साधनांची वैधता ठरवणार कोण? दुसरा संलग्न मुद्दा म्हणजे साधने जर शुद्ध असतील तर तीच साध्ये होतात. किंवा साध्ये अप्रस्तुत ठरतात. शुद्ध साधनांपुरतेच आंदोलनांचे कार्य मर्यादित मानले तर 'चिरंतन आंदोलन' ही शक्यताही विचारात घ्यावी लागेल.

त्यासाठी 'साध्य' या शब्दातून ध्वनित होणारा वरवरचा अर्थ आणि खोलातला अर्थ पाहू. वरवरचा अर्थ म्हणजे आंदोलनाची मागणी मान्य झाली की साध्य मिळाले, आंदोलन यशस्वी झाले. या अर्थाने चिरंतन आंदोलन म्हणजे ठरवलेले साध्य हेही साधनच होणार आहे याची जाणीव होणारे आंदोलन - म्हणजे 'साध्य' असे नसतेच. दुसऱ्या अर्थानेही, माझ्या मते कोणत्याही सामाजिक आंदोलनाला 'अंतिम साध्य' असू शकत नाही. असलेच तर पहिल्या अर्थाने मैलाचे दगड असतात. साध्याचा हा अर्थ जरा खोलात जाऊन पाहू.

'अंतिम साध्य' म्हणजे जे साध्य प्राप्त झाले, की त्याच्यापुढे जाताच येत नाही असे साध्य. 'शोषणमुक्त जग' हे अंतिम साध्य उदाहरणादाखल घेऊ. असे जग प्रत्यक्षात आल्या'नंतर'च अंतिम साध्य प्राप्त झाले असे म्हणता येते. कारण ध्येयप्राप्तीपर्यंतच्या प्रवासात केव्हाही काहीही घडू शकते. सुरूवातीचे शोषक-शोषित बदलू शकतात, शोषणाची नवी रूपे सामोरी येतात, मूळ आंदोलनाशी संलग्न किंवा अगदी असंलग्न असे नवीनच प्रश्न अधिक निकडीचे होऊ शकतात.

यामध्ये साध्याचे मायावी रूप लक्षात घेतले पाहिजे. पश्चिमेतील स्त्रीवादी चळवळीचे लेखात आधी उल्लेख केलेले उदाहरण परत जरा पुढे पाहू. तेथे आता बऱ्यापैकी स्त्री-पुरुष समानता आली पण स्त्रियांची भावना अशी आहे की या चळवळीने स्त्रियांना समाधान लाभले नाही. समानतेने समाधान लाभेल या अपेक्षेने चळवळ सुरू झाली का नाही हा मुद्दा नाही. समाधान हे एक साध्य होते असे गृहित धरले तर आंदोलन ज्या समान हक्कांसाठी झाले ते हक्क मिळाले, आंदोलन यशस्वी झाले पण साध्य प्राप्त झाले नाही. ती अपेक्षाच नव्हती असे असेल तर 'समाधान' हे नवीनच साध्य दरम्यान उपस्थित झाले आहे.

मग प्रश्न असा येतो की साध्य ही फक्त सांगायची गोष्ट आहे का? ते एक मृगजळच आहे का? एका अर्थाने होय. या विधानात मला अप्रामाणिकपणा दिसत नाही. ती मानवी वृत्तीच्या मर्यादेची कबुली आहे. 'आंदोलन कशासाठी' याला दृश्य, ठोस उत्तर असल्याखेरीज, काहीतरी मागण्या असल्याखेरीज आंदोलन उभे रहाणे, चालू रहाणे असंभवनीय वाटते. साध्याअभावी तो भरकटलेला असंतोष होईल, आंदोलन होणार नाही.

साधनशुचितेच्या संकल्पनेला हे वास्तव भान आहे. 'साध्य' खऱ्या अर्थाने कधीच मिळत नाही. आजचे सगळे विस्थापित पुन्हा स्थापित झाले तरी नवीन, वेगळ्या प्रकारचे विस्थापित दरम्यान निर्माण होणार; या पुन:स्थापितांचे तदनुषंगिक नवे प्रश्न निर्माण होणार. मूळ मागण्या मान्य झाल्या असल्या, तरी तेव्हा काही आंदोलन 'संपले' असे जाहीर करता येत नाही.

म्हणजे साध्य ही संकल्पना आहे, दिशा आहे, 'वस्तु' नाही.

'शेवटच्या माणसाचे अश्रू पुसणे' ही दिशा आहे. 'संपूर्ण क्रांती हमारा नारा है' ही दिशा आहे. 'गरीबी हटाव' हीही दिशा आहे. साधन हे वास्तव आहे. आंदोलन म्हणजे तंत्रज्ञान नव्हे. तंत्रज्ञानात साध्य आणि साधन दोन्ही वास्तव असतात. पेट्रोल संपले म्हणून

आंदोलने सत्तेत जातात तेव्हा -

लॅटिन अमेरिकेतील अनेक देशात लष्करी किंवा लष्कराने पाठिंबा दिलेल्या हुकूमशाही राजवटी जाऊन लोकशाही राजवटी आल्या. बहुतेक सगळ्या नव्या राजवटी जनआंदोलनाच्या मार्गाने आल्या. अल्पभूधारक, भूमिपुत्र, आदिम जमाती, औद्योगिक कामगार वगैरेंच्या सार्वजनिक असंतोषातून नेतृत्व उभे राहिले आणि सत्तांतर झाले. त्यामुळे कालचे आंदोलनांचे नेते सत्तेवर आले. त्यावेळी लॅटिन अमेरिका 'डावी'कडे झुकत आहे असा समज झाला.

जेम्स पेट्रास या लॅटिन अमेरिकेच्या अभ्यासकाच्या मते मात्र या नेतृत्वाने आंदोलनांचा विश्वासघात केला आहे. ज्या गरीब लोकांनी यांना सत्तेवर आणले, त्यांच्याविरुद्धच आता धोरणे राबवली जात आहेत. अनेक अंतर्विरोध या दरम्यान पुढे आले आहेत. अमेरिकेचे प्रभुत्व कमी झाले आहे, जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे प्रभुत्व कमी झाले आहे पण स्थानिक नव-भांडवलदारांचे बळ वाढत आहे. नेतृत्व या भांडवलदारांच्या इशाऱ्यावर आता चालत आहे. लॅटिन अमेरिकेतील शेतमाल आणि खनिजे यांची निर्यात अलिकडे अचानक वाढल्याने नवीन पैसा मोठ्या प्रमाणात या देशांमध्ये येऊ लागला. त्याचा वापर श्रमिकांच्या भल्यासाठी होण्याऐवजी आहे-रे वर्गाच्या श्रीमंतीत भर पडत आहे. ही मिळकत अधिक वेगाने वाढवण्यासाठी नैसर्गिक संसाधनांची लूट पूर्वीपेक्षा अधिकच वेगाने केली जात आहे. त्यामुळे स्थानिक शेतकरी, जंगलावर आधारित जीवनव्यवस्था असणारे समाजाचे घटक - किंबहुना आधीच्या आंदोलनांना ज्यांनी पाठिंबा दिला, ते सगळेच घटक - परत शोषणाचे बळी होत आहेत. शासकीय हिंसाचार, व्यापारी पिकांसाठी त्यांच्या पारंपारिक जमिनी बळकावणे हे परत सुरू झाले आहे.

म्हणजे, आंदोलनांचे सत्ताग्रहण हे लॅटिन अमेरिकेला वरदान ठरेल असे वाटले होते, त्या उलट परिस्थिती अल्पावधीच निर्माण झाली आहे.

बंद पडलेली गाडी पेट्रोल भरले की परत चालू होते. आंदोलन माणसांशी संबंधित असते. त्यावर अतर्क्य, अनपेक्षित घटनांचा, प्रक्रियांचा हरघडी परिणाम होत असतो. साधनशुचिता या गतिमानतेमुळे सतत तपासावी लागते. कारण निश्चितपणे हातात साधनेच असतात.

जनआंदोलनांच्या संदर्भात नव्हे पण राजकीय बदलाच्या संदर्भात चीन आणि रशियाचे उदाहरण घेऊ. साम्यवादी राज्यव्यवस्था आणणे हे साध्य होते त्या काळात या दोन्ही राष्ट्रात प्रचंड नरसंहार झाला. आदर्शवादाच्या नावाखाली साधनशुचितेची पर्वा केली गेली नाही. कारणे काही असोत पण नंतर रशियाचे विघटन झाले आणि चीनला साम्यवादाची कास सोडावी लागली. म्हणजे ईप्सित तर मिळाले नाहीच पण जवळजवळ दोन पिढ्या त्या साध्याच्या नावाखाली अधिकृत शासकीय दहशतवादात बळी गेल्या. या सामाजिक जखमांवरून साधनशुचिकतेचे महत्त्व लक्षात यावे.

आता परत हिंसक साधने अवलंबणाऱ्या आंदोलनांकडे वळू. जनआंदोलन आणि हिंसा यात अंतर्विरोध आहे. राज्यसंस्थेएवढी हिंसेची मक्तेदारी कोणाकडेच नसते. पण त्या मक्तेदारीला नैतिक अधिष्ठान नाही म्हणून राज्यसंस्थेच्या किंवा समाजाच्या इतर घटकांच्या विरोधात तीच हत्यारे घेऊन उभे रहाणे म्हणजे एकाने गाय मारली म्हणून दुसऱ्याने वासरू मारणे आहे. हिंसेवर आधारित नागरी संघटना जगभर आहेत. त्यांच्या दहशतीखाली, प्रभावक्षेत्रातील लोक दबूनही वागतील पण त्याचा अर्थ बहुतांशी लोकांचा पाठिंबा मिळून जनआंदोलन उभे राहते असा होत नाही. पश्चिमेतील अनेक देशात गौरवर्णीयांच्या प्रभुत्वासाठी हिंसक मार्ग अवलंबणाऱ्या नव-नाझी संघटना आहेत. मुस्लिम मूलतत्त्ववाद्यांच्या संघटना अनेक देशात हिंसक उद्रेक करत आहेत.

साधनशुचितेचा तात्त्विक भाग सोडा पण अगदी व्यावहारिक पातळीवरही हिंसा हे हत्यार बहुसंख्यांकांना परवडणारेच नाही. त्याची मानसिक, सामाजिक, आर्थिक किंमत पहाता, विधायकतेसाठी त्याची साशंक परिणामकारकता पाहता अगदी नैतिकदृष्ट्या हिंसा हाच पर्याय राहिला तरी त्यावर जनआंदोलन चालू शकत नाही.

राज्यसंस्थेच्या हिंसेवरच्या मक्तेदारीचा उल्लेख केला. त्याच अनुषंगाने- वैधानिकतेवरही राज्यसंस्थेचीच मक्तेदारी असते. मग आंदोलकांनी कायदा हातात घेणे म्हणजे परत वासरू मारणे नाही काय असा आक्षेप घेतला जाऊ शकतो. म्हणून राज्यसंस्थेच्या नैतिक अधिकाराचा उल्लेख केला. वैध काय आणि अवैध काय हे ठरवण्याचा नैतिक अधिकार जर राज्यसंस्थेने गमावला असेल, तर ते अध:पतन समाजाच्या सद्सद्विवेकबुद्धीला पटत नाही. उदाहरणार्थ काही महिन्यांपूर्वी मियानमार (ब्रह्मदेश) मध्ये बौद्ध भिक्षू सरकारविरुद्ध रस्त्यावर आले. तेथील जनतेच्या मतानुसार सरकार अनैतिक वागत होते आणि भिक्षू नैतिक. मग भले रंगूनमधला त्यावेळचा कर्फ्यूचा आदेश भिक्षूंनी मोडला असेल. हिंसेची अवैधता आणि अहिंसेची अवैधता यात हा फरक आहे. अगतिकतेतून आलेली हिंसा फारतर नैतिक संदिग्धतेत जाईल, ती सद्सद्विवेक बुद्धीला संपूर्णपणे मान्य होत नाही. साधनशुचितेचा हा आणखी एक व्यावहारिक पैलू आहे.

अशा पार्श्वभूमीवर जनआंदोलनांचे नक्की योगदान काय? वर म्हटल्याप्रमाणे जर साध्यच 'असाध्य' (!) असेल, तर आंदोलनांनी साधनांवर लक्ष केंद्रित करणे उचित. श्रेय परिवर्तनासाठी सामाजिक असंतोष जागृत ठेवणे हे चिरंतन आंदोलन.

व्यर्थ बलिदान?

नायजेरिया या आफ्रिकेतील देशात तेलाचे प्रचंड साठे आहेत. तेलाचे उत्पादन बहुराष्ट्रीय कंपन्या व सरकार यांच्या संगतमताने होते. हे साठे देशाच्या ज्या भागात आहेत, तेथे कमालीची गरीबी आहे. त्या भागातील सुमारे साठ लाख लोकसंख्येतील ७०% लोक दारिद्र्यरेषेखाली रहातात. त्यांची परिस्थिती गेल्या तीस वर्षात सुधारण्याऐवजी आणखीच वाईट झाली आहे. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार देशाची एक टक्का लोकसंख्या तेलापासून मिळणारी बहुतेक संपत्ती गिळंकृत करते. १९६० पासून असे अब्जावधी डॉलर्स राज्यकर्त्यांनी वैयक्तिकरीत्या पळवले आहेत. याविरुद्ध अनेक आंदोलने उभी राहिली, ती लष्करामार्फत चिरडून टाकण्यात आली. यातील सगळ्यात भयानक उदाहरण केन सारो-विवाचे. हा नायजेरियातील लेखक आणि टीव्ही प्रोड्युसर. १९९० पासून तो सरकार आणि शेल आणि ब्रिटिश पेट्रोलियम या तेथील बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलने करत होता. १९९४ साली त्याच्यावर खोटे खटले भरून १९९५ साली त्याला आणि त्याच्या सात सहकाऱ्यांना फाशी देण्यात आली.

आंतरराष्ट्रीय स्तरावर या फाशीचा औपचारिक निषेध झाला. लंडनमध्ये त्याचे स्मारकही उभारण्यात आले. पण आजही आंदोलनाच्या विरुद्ध दमनचक्र पश्चिमेच्या पाठिंब्याने चालू आहे.

चंद्रशेखर पुरंदरे
वेबसाईट - www.art-non-deco.com
ईमेल - artnondeco@yahoo.co.uk